महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २७६ वे | दिनांक : ०२/१०/२०२६ | वार : शुक्रवार

## मंत्री शिरसाटांवर गंभीर आरोप; 'शाळांच्या पैशांसाठी ३५ लाखांची मागणी



**मुंबई :** राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर धाराशिव येथील आश्रमशाळा संस्थाचालक अरुण निटूरे यांनी अत्यंत गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. एका इमारतीच्या गच्चीवरून स्वत: रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओमध्ये निटूरे यांनी मंत्री शिरसाट, त्यांचे स्वीय सहाय्यक (PA) आणि समाजकल्याण विभागाच्या कारभारावर संतप्त सवाल उपस्थित केले आहेत. "गोरगरीब विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळांचे अनुदान वर्षानुवर्षे अडवून ठेवायचे आणि मंत्र्यांच्या बंगल्यांवर पीएंच्या माध्यमातून ३५ ते ४० लाखांची उघड लाच मागायची," असा थेट आरोप करत निटूरे यांनी या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये संस्थाचालक अरुण निटूरे यांनी थेट मंत्री संजय शिरसाट यांना उद्देशून संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. "आम्ही हलाखीच्या परिस्थितीत गोरगरीब, मागासवर्गीय मुलांची काळजी घेत आश्रमशाळा चालवतो. मात्र, गेल्या २७ वर्षांपासून या आश्रमशाळांचे शासकीय पैसे आणि अनुदान अडवून ठेवण्यात आले आहे. गोरगरिबांचा तळतळाट घेऊ नका, शाळांचे पैसे देऊन टाका." "हजारो शिक्षक विनावेतन काम करत असून कित्येक जण २०-२० वर्षे सेवा करून विनापगारी निवृत्त झाले आहेत. शासन निर्णय न घेता फायली दाबून बसल्यामुळे आज संस्थाचालक आणि शिक्षकांवर विष पिऊन आत्महत्या करण्याची वेळ आली आहे," असा उद्विग्न सवाल त्यांनी केला. मंत्री संजय शिरसाट यांच्या वाढत्या संपत्तीवर थेट बोट ठेवत निटूरे म्हणाले, "जिल्हा परिषद सदस्य असलेला सामान्य कार्यकर्ता आज इतका मोठा कसा झाला? पाच-पाच कोटी रुपयांच्या गाड्या (डिफेंडर, मर्सिडीज), ७५ कोटी रुपयांचे आलिशान बंगले आणि हजारो कोटींची माया आली कुठून? हे पैसे शेतात घाम गाळून कमावले आहेत का?" "मंत्र्यांच्या बंगल्यांमध्ये केवळ टक्केवारीचे व्यवहार चालतात. दलित वस्तीच्या कामांमध्ये १५ ते २० टक्के कमिशन लाटले जात असून कंत्राटदार आत्महत्या करत आहेत, तर दुसरीकडे मंत्र्यांच्या ताफ्यात नव्या गाड्या दाखल होत आहेत," असा गंभीर आरोप त्यांनी केला. निटुरे यांनी केवळ मंत्र्यांवरच नव्हे, तर त्यांच्या प्रशासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांची नावे घेऊन पैसे मागितल्याचा दावा केला आहे. "मंत्र्यांनी पीए पैसे गोळा करण्यासाठी ठेवले आहेत का? त्यांचे स्वीय सहाय्यक भंडारे हे एका वस्तीगृहाच्या २४ मुलांच्या मान्यतेसाठी ३५ ते ४० लाख रुपयांची उघड मागणी करतात. या संदर्भातील सर्व पुरावे मी देण्यास तयार आहे."समाजकल्याण विभागाचे सचिव हर्षदीप कांबळे यांच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला असून संविधानानुसार काम न करता फायली अडवून ठेवल्या जात असल्याचा आरोप केला. "ज्यांनी पैसे दिले, त्यांच्याच फायली निघतात; फुकट कोणाचेही काम होत नाही आणि भाषणात मात्र 'कोणालाही पैसे देऊ नका' असा केवळ आव आणला जातो," असा टोला त्यांनी लगावला. व्हिडिओच्या शेवटी त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हस्तक्षेपाची मागणी केली. "उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना समाजकल्याण खात्यात काय चालले आहे हे कसे दिसत नाही? सरकार सामान्य गरिबांची चौकशी करते, पण अशा मंत्र्यांकडे इतकी अमाप संपत्ती कुठून आली याची चौकशी का करत नाही? फडणवीस साहेबांनी तत्काळ या प्रकरणाची आणि शिरसाट यांच्या संपत्तीची निष्पक्ष चौकशी करावी आणि गोरगरीब विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळांचे हक्काचे अनुदान तातडीने मंजूर करावे," अशी मागणी अरुण निटूरे यांनी केली आहे. दरम्यान, एका आश्रमशाळा संस्थाचालकाने थेट समाजकल्याण मंत्र्यांवरच भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करणारा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित केल्याने महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

## समुद्रकिनारी मोठी दुर्घटना सहलीसाठी आलेल्या ८ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू



**रायगड :** कोकणातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील दिवेआगर समुद्रकिनारी गुरुवारी (१ ऑक्टोबर) मोठी दुर्घटना घडली. पुणे जिल्ह्यातील आळंदी येथून सहलीसाठी आलेल्या ८ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. समुद्रातील पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे दिवेआगर परिसरात मोठी खळबळ उडाली असून समुद्रकिनारी शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आळंदी येथील विनर्स अकॅडमी या खासगी शिकवणी वर्गातील विद्यार्थी सहलीसाठी दिवेआगर येथे आले होते. या सहलीत एकूण ४२ विद्यार्थी आणि २ शिक्षक, असे ४४ जण सहभागी झाले होते. समुद्रकिनारी गेल्यानंतर काही विद्यार्थी पाण्यात पोहोण्यासाठी उतरले. मात्र, समुद्रातील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने काही विद्यार्थी पाण्यात ओढले गेले. या दुर्घटनेत ८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. सर्व मृतदेह समुद्रातून बाहेर काढण्यात आले असून ते बोर्ली पंचतन प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले आहेत. मृत विद्यार्थ्यांपैकी सर्वजण अकरावीचे विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. महाकाली वॉटर स्पोर्ट्सच्या कर्मचाऱ्यांनीही मृतदेह बाहेर काढण्यासाठी मदत केली. स्थानिक नागरिकांनी बचावकार्याला सहकार्य केले. प्रशासनाकडून घटनास्थळी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून दुर्घटनेच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. मंत्री भरत गोगावले आणि आदिती तटकरे यांनी प्रशासनाशी संपर्क साधून घटनेची माहिती घेतल्याचे सांगण्यात आले आहे. दिवेआगर समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. त्यांनी दुर्घटनेची सविस्तर माहिती घेत बचावकार्य आणि मदतकार्याबाबत प्रशासनाकडून आढावा घेतला. तसेच परिस्थितीवर प्रशासनाने तातडीने लक्ष ठेवावे आणि आवश्यक ती मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. दुर्घटनेत मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी दु:ख व्यक्त केले आहे.

## २ तोळे सोन्यासाठी गरोदर सुनेचा छळ सिझेरियनचा खर्च नाकारल्याने स्वातीचा बाळासह मृत्यू, पतीसह ४ जणांवर गुन्हा



**छत्रपती संभाजीनगर :** माहेरहून २ तोळे सोने आणण्यासाठी विवाहितेचा छळ केल्याचा आणि गंभीर प्रकृती असतानाही वैद्यकीय उपचारांसाठी मदत न केल्याचा धक्कादायक प्रकार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यात समोर आला आहे. नऊ महिन्यांची गर्भवती असलेल्या २६ वर्षीय महिलेची प्रकृती बिघडल्यानंतर डॉक्टरांनी तातडीने सिझेरियन शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, सासरच्या मंडळींनी शस्त्रक्रियेचा खर्च करण्यास नकार दिल्याचा आरोप आहे. त्यामुळे वेळेत उपचार न मिळाल्याने संबंधित महिला आणि तिच्या पोटातील बाळाचा मृत्यू झाला. या प्रकरणी पती, सासू, सासरे आणि नणंद अशा चार जणांविरोधात पाचोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समीक्षा ऊर्फ स्वाती विशाल निंबाळकर (वय २६) असे मृत महिलेचे नाव आहे. ती पैठण तालुक्यातील विहामांडवा येथे सासरी राहत होती. तिचे वडील सदाशिव शंकर देशमुख हे बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यातील राहेरी येथील रहिवासी आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, स्वातीच्या लग्नानंतर काही दिवसांनीच सासरच्या मंडळींकडून माहेरहून २ तोळे सोने आणण्यासाठी तिच्यावर दबाव टाकला जात होता. या मागणीवरून तिला वारंवार मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. स्वाती गरोदर असतानाही सासरच्या मंडळींकडून सोन्याच्या मागणीसाठी तिचा छळ सुरू होता, असे तिच्या वडिलांनी पोलिसांना सांगितले. गरोदरपणात महिलेला विशेष काळजी आणि वेळेवर वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असते. मात्र, स्वातीला या काळातही त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप आहे. दरम्यान, तिच्या प्रकृतीत बिघाड झाल्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर बनली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६


## बौद्ध लेण्यांकडे जाणाऱ्या मार्गाची दुरवस्था, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे कुलगुरूंना निवेदन





**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पत्रकारिता विभाग ते विधी विभागादरम्यानचा रस्ता अत्यंत खराब झाला असून, विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. येत्या २० ऑक्टोबर रोजी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त बौद्ध लेण्यांकडे महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक येणार असल्याने, त्यापूर्वी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलनाने केली आहे. यासंदर्भात आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठाच्या कुलगुरूंना निवेदन सादर केले. पत्रकारिता विभाग ते विधी विभागापर्यंतचा रस्ता खराब झाल्यामुळे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना दररोज ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. रस्त्यावरील खड्डे आणि खराब पृष्ठभागामुळे वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना त्रास होत असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. विद्यापीठ परिसरातील रस्ते दर्जेदार आणि सुरक्षित असणे आवश्यक आहे. मात्र, या मार्गाची दुरवस्था विद्यापीठाच्या प्रतिमेलाही बाधा आणत असल्याचे आंदोलनाचे म्हणणे आहे. धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर बौद्ध लेण्यांकडे जाणाऱ्या या मार्गावर महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यामुळे कार्यक्रमापूर्वी रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास नागरिकांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसह नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने रस्त्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, विद्यापीठातील इतर रस्त्यांची कामे होत असताना बौद्ध लेण्यांकडे जाणाऱ्या या रस्त्याचे काम रखडल्याने समाजामध्ये विविध चर्चा होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनाने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून या संदर्भातील गैरसमज दूर करावा, अशी मागणीही आंदोलनाने केली आहे. निवेदनावर सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान, तसेच अमरदिप हिवराळे आणि अविनाश सावंत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाची प्रत विद्यापीठाचे कुलसचिव तसेच स्थावर मालमत्ता विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आली आहे.

## बीड येथे निवृत्तवेतनधारकांसाठी ६ ऑक्टोबरला महा-उपलब्धी ॲप विषयक मार्गदर्शन कार्यशाळा

**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्यातील सेवानिवृत्तवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तवेतनधारकांसाठी राज्य शासनाच्या वित्त विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सेवानिवृत्तीवेतनाविषयक सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी दि. १ जुलै २०२६ पासून महा-उपलब्धी हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व सेवानिवृत्तवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तवेतनधारकांनी दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बीड येथील सामाजिक न्याय भवनातील कार्यशाळेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. या डिजिटल सुविधेमुळे आता निवृत्तवेतनधारकांना हयातनामा सादर करणे किंवा आयकर विषयक फॉर्म १६ मिळवणे अशा कामांसाठी वारंवार कोषागार कार्यालयात फेऱ्या मारण्याची आवश्यकता भासणार नाही. या नव्याने सुरू झालेल्या मोबाईल ॲपबाबत सेवानिवृत्तवेतनधारकांमध्ये व्यापक जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व कोषागार कार्यालयांच्या वतीने एकाच दिवशी आभासी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. वित्त विभागाचे प्रधान सचिव यांच्या निर्देशानुसार बीड येथील जिल्हा सामाजिक न्याय भवनात मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला स्वतः प्रधान सचिव हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहून सेवानिवृत्तवेतनधारकांना थेट मार्गदर्शन करणार आहेत. वित्त विभागाने विकसित केलेले हे महा-उपलब्धी ॲप अँड्रॉईड आणि आयओएस अशा दोन्ही प्रणाली असणाऱ्या मोबाईल फोनवर उपलब्ध आहे. या ॲपच्या वापरामुळे ज्येष्ठ नागरिकांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाचणार आहेत. या कार्यशाळेमुळे महा-उपलब्धी ॲप हाताळताना येणाऱ्या अडचणी व शंकांचे जागेवरच निरसन करणे सुलभ होण्यास मदत होणार आहे. असेही कळविले आहे

## वृद्धांच्या आरोग्याची काळजी घेणे ही सामाजिक जबाबदारी; आरोग्य तपासणी शिबिरातून जनजागृती




**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय वृद्धत्व दिनानिमित्त दत्तक घेतलेल्या रहाळपट्टी तांडा, जटवाडा येथील वृद्धांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. वृद्धांच्या आरोग्याची नियमित तपासणी, योग्य आहार-विहार आणि निरोगी जीवनशैलीबाबत जनजागृती करणे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता.या शिबिरात वृद्धांची मधुमेह, रक्तदाब तसेच डोळ्यांची तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर वृद्धांनी आपल्या आरोग्याची नियमित काळजी कशी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. योग्य व संतुलित आहार, नियमित व्यायाम, स्वच्छता, पुरेशी विश्रांती आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी यांचे महत्त्व डॉ. कल्पना गंगावणे यांनी समजावून सांगितले. वाढत्या वयात आरोग्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर तपासणी व आवश्यक उपचार घेणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनाक्षी देव-निमकर यांची उपस्थिती होती. आरोग्य तपासणी शिबिराच्या आयोजनासाठी राधिका दैठणकर, प्राची देशमुख, सिद्धी रत्नपारखी आणि रिया गुरखुदे यांनी सहकार्य केले. रहाळपट्टी तांडा, जटवाडा येथील अनेक वृद्धांनी या शिबिराचा लाभ घेतला.वृद्धांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून वृद्धांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांच्याप्रती संवेदनशीलता जपणे आणि त्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती करणे याचा संदेश देण्यात आला.या आरोग्य तपासणी शिबिरासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## जेईएस महाविद्यालयाला जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत दोन पुरस्कार

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जालना एज्युकेशन सोसायटीचे आर. जी. बागडिया कला, एस. बी. लखोटिया वाणिज्य आणि आर. बेझोनजी विज्ञान महाविद्यालय, जालना या संस्थेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धा 2026 मध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागातून दोन पुरस्कार मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.उबाळे सदाशिव भानुदास यांनी सादर केलेल्या "Smart Soil Moisture Mapping & Precision Drip Irrigation System" या प्रकल्पाला उत्तेजनार्थ पारितोषिक (Consolation Prize) प्राप्त झाले. तसेच ज्ञानेश रामचंद्र चौधरी यांनी सादर केलेल्या "Development of a Low-Cost IoT-Based Multi-Parameter Water Quality Monitoring System" या प्रकल्पाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदनया संपूर्ण आविष्कार उपक्रमाच्या नियोजन, मार्गदर्शन आणि समन्वयासाठी महाविद्यालयाच्या आविष्कार समन्वयक डॉ. अरुणा महारोलकर यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संशोधन संकल्पना प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली.या प्रकल्पांच्या तयारी, मार्गदर्शन आणि सादरीकरणामध्ये आविष्कार समन्वयक डॉ. अरुणा महारोलकर महत्त्वपूर्ण योगदान लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ. उमेश मोगले, आविष्कार समन्वयक डॉ. अरुणा महारोलकर, डॉ. पल्लवी नथानी, डॉ. सुषमा दिपवाळ, डॉ. राजेश सरकाटे, डॉ. मिताली मित्तल तसेच महाविद्यालयातील विद्यार्थीवर्गाने दोन्ही पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६


## ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ उपक्रमातून वैद्यकीय तज्ज्ञ साधणार तरुणाईशी थेट संवाद

**मुंबई/बीड (भगवंत पाळवदे)** : नवरात्रोत्सवात राज्यातील महाविद्यालयीन तरुणाईच्या आरोग्याचा जागर केला जाणार आहे. वाढता स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि मानसिक ताण यामुळे तरुणांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. या पार्श्वभूमीवर आजार टाळण्यासाठी तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागृती व्हावी, यासाठी राज्यात प्रथमच ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ हा नऊ दिवसांचा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ राज्यभरातील विद्यार्थ्यांशी थेट आरोग्यविषयक संवाद साधणार आहेत.विद्यार्थ्यांशी थेट संवादराज्यातील वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला आणि इतर विद्याशाखांतील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होतील. प्रत्येक जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. तरुण वयात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचे परिणाम पुढील आयुष्यात जाणवू शकतात. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार घेण्याबरोबरच आजार टाळण्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मानसिक आरोग्याची काळजी, व्यसनांपासून दूर राहणे आणि वेळेवर आरोग्य तपासणी यांचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागृत राहण्याबरोबरच ही माहिती कुटुंब, मित्र आणि समाजापर्यंत पोहोचवावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.संवादाचे विषय :- बदलती जीवनशैली आणि तरुणांचे आरोग्य- संतुलित आहार आणि बदललेल्या आहाराच्या सवयी- व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्ती- मानसिक आरोग्य- मोबाईल, सोशल मीडिया आणि वाढता स्क्रीन टाइम- व्यसनांपासून दूर राहणे- निरोगी जीवनशैली आणि आरोग्यदायी समाजनिर्मिती‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ हा उपक्रम राज्यातील तरुणाईशी थेट संवाद साधणारा हा पहिलाच उपक्रम आहे. सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत तरुणांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर त्यांच्याशी थेट संवाद साधणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना या संवादातून आरोग्याशी संबंधित प्रश्न मोकळेपणाने मांडता येणार आहेत. तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती आरोग्यदायी जीवनशैली करिता विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणार असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी म्हटले आहे




# मन्ही अहिरानीकर्ता

१६ जानेवारी २०२४ ले संध्याकाळे धुळातीन जगदीश देवपूरकर आनि डॉ. सदाशिव सूर्यवंशी यास्ना (कॉन्फरन्स) फोन वना. रामराम शामशाम जयं आनि त्यास्नी सांगं, “२५ फेब्रुवारी २०२४ ले सातवं अखिल भारतीय अहिरानी साहित्य संमेलन घेनं शे आनि तुम्ही त्यानं अध्यक्षस्थान घेवानं शे, आशा आमना सगळास्ना- धुळाना खान्देश साहित्य संघना आग्रह शे.” (ह्या संमेलनमा महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यास्नाबी सहभाग व्हता.)

मी लगेच म्हंतं, “तुमना प्रेमना माले आदर असना तरी आते माले चालता येत नही आनि उलशी पायथोरीबी चढता येत नही, म्हनीसन मी आता कथाच जात नही. आपू गैरसमज करी घिऊ नका.” त्या म्हनेत, “आम्ही तुमनी सगळी काळजी घिसूत. व्हिलचेअर राही तुमले. पन अध्यक्ष तुम्हीच पायजेत. तुमनं काम मोठं शे. हाऊ मान तुमले यानं आगोदरच मिळाले पायजे व्हता. पन आता नही म्हनू नका.”

म्हंतं, “माले इचार कराले दोन याळ द्या.”

त्या म्हननात, “त्यामा काय इचार करना. दोन मानसं कायम तुमनी काळजी घेवाले सोबत ऱ्हातीन. सकाळीजनं सत्र जयं का तुम्ही निंघी जा. पन नही म्हनू नका. आमले अध्यक्ष तुम्हीच पायजे यंदा.” म्हंतं, “तरीबी इचार कराले दोन याळ पायजेतच माले.”

म्हनेत, “बरं चालई. परो करतंस फोन. पन व्हकारच द्या बरका.” १८ जानेवारीले संध्याकाळे बरोबर त्याच येळे आखो दोन्हीस्ना फोन वना. म्हनेत, “मंग नक्की ना? जाहीर करी टाकतंस सकाळ.”

“तब्बेत माले साथ देत नही... पन तुमना या प्रेमना आग्रहखातीर आनि अहिरानी मायकर्ता माले नही म्हनाले जीववर यी ऱ्हायनं. इसू मी. पन माले आता चालता येत नही, हायी ध्यानात राहू द्या, व्हिलचेअर लागईच.”

“ती काहीच काळजी करू नका. आम्ही लागतंस कामले मंग.” “बरं.”

पायस्पशी आबळावामुळे उलसा २ वरीसना व्हतू तैन्हपशी चालाले- पायऱ्या चढाले आवकाळ्या करन्या पडेत (पोलिओ). पन यान्ह आगोदर हात टेकी का व्हयेना पन घरन्या- गाडीन्या- जिनान्या पायथोऱ्या कशातरी चढू. तरीबी बडोदा, तेजगड, छोटा उदयपूर, भोपाळ, दिल्ली, कलकत्ता, म्हैसूर आठे अहिरानी भाषा मांडाकर्ता- अहिरानी लोकसंस्कृती जताडाकर्ता कटाळा कया नही- त्या त्या येळे जायी वनू. ‘अहिरानी ढोल’ना संपादनकर्ता बडोदाना भाषा केंद्रमा ते दर सहा महिनातून चक्कर व्हये. काही येस्टीतून ते काही आगगाडीतून झडा दी ह्या दूरदूरना प्रवास कयात. पन जठे जावानं गरजनं वाटनं तठेच. (नेमकाच जागे आजपावत गऊ. फक्त तब्बेतमुळे आशे नही, काही तत्वसमुळे संमेलनं- भाषणं- कविता वाचन आजपावत टाळत वनू. पन भाषा आणि लोकसंस्कृतीकरता नेमक्या जागा टाळू ना.) नेमकी जागे जानंबी आता पायस्ले झेपत नही... झोल जास... खाल बठनू त्ये ऊठता येत नही. आता पायथोऱ्या ते दूरच पन मोकळं चालताबी येत नही. हायी बाब आजूनबी बराच लोकस्ले माहीत नही. (ज्यास्नी समोरासमोर आजून गाठभेट नही, त्यास्ले मन्हा आधुपनबद्दल माहीत नही. मीबी हाटकून सांगत नही.) पन आज सांगनं वनं, त्याले इलाज नही...

१९ जानेवारीपशी मन्हा सगळा बाकीना कामं बंद करीसन अहिराणीवर अध्यक्षीय भाषण लिव्हाले घिदं. रातपहाटकरी हायी भाषण १० फेब्रुवारीपावत लिव्हता लिव्हता पुरं कयं. सगळं मुद्दानं मांडता मांडता हायी भाषण संगनकना ६९ पानस्नं व्हयी गयं. आवढं भाषण ते संमेलनमा बोलता येनार नही, म्हनीसन ते आखो भयान उलसं करत १५ पानस्वर आनं आनि डॉ. सदाशिव सूर्यवंशी सरकडे छापाकर्ता (संमेलनमा आयकनारास्ले वाटाकर्ता) धाडी दिधं. त्यास्नी आखो पैभारे काटछाट करीसन ते आठ पानस्मा बसाडं. संमेलनमाबी मुद्दानं फक्त १५ पानातलं भाषन लोकसमोऱ्हे (येळकाळना गणितमुळे) सांगानं ठरायं. पन तेबी माले तठला येळना गणीतमा बसाडीसन जशेनतशे मांडता वनं नही. आटोपतं घेनं वनं. त्यामाबी काटछाट करनी पडनी.

म्हंजे सांगाना मुद्दा काय ते ह्या संमेनना अध्यक्ष-भाषणमा अहिरानी भाषाकर्ता मी ज्या काही मुद्दाना इचार मांडी ठियेल व्हतात त्या लोकसमोर्हे आजून सगळा जशानतशा वना नहीत. मंग ह्या ६९ पानंस्नी येगळी पुस्तिका काढानी गरज वाटनी. त्या मुद्दा टहाळबन करता करता मजकूर वाढीसन तो आखो ८८ पानंसपावत गया. आनि ते सगळं भाषण म्हंजेच आता प्रकाशित व्हयनं ते ‘भाषा अहिराणी’ हायी पुस्तक. बाकी मी काय मांडं ते पुस्तकमा आता सगळं इयेलच शे. ते आठे आखो कितलं घडी घडी आखूड करी सांगवा... पुस्तक : भाषा अहिराणी (भाषाविषयक पुस्तक)लेखक : डॉ. सुधीर राजाराम देवरेप्रकाशक : शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. पुस्तकाचे प्रकाशन : २६ मार्च २०२६मुखपृष्ठ : सरदार जाधवपृष्ठ संख्या : ८८, किंमत : १६० रूपये.

**डॉ. सुधीर राजाराम देवरे**

**http://sudhirdeore29.blogspot.com**

9822525444



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६


## मूल्ये-संस्कार जपल्याशिवाय माणूस घडणार नाही: कवयित्री गुंजन पाटील




**उमरगा :** आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाच्या काळात तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना मानवी मूल्ये, संस्कार आणि माणुसकी जपणे अधिक गरजेचे आहे. जात, धर्म आणि वर्गाच्या भिंती ओलांडून माणूस म्हणून एकमेकांशी जोडले जाणे आवश्यक आहे. "मानसातला हा दुरावा सलतो मला, माझ्या कवितेतून हे अंतर मिटावे," हीच आपल्या लेखणीमागची भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवयित्री व व्याख्यात्या गुंजन पाटील यांनी केले.श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भारत शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कर्मयोगी (कै.) श्रीधररावजी मोरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'कर्मयोगी श्रीधररावजी मोरे व्याख्यानमाले'च्या दुसऱ्या पुष्पात 'मूल्य-संस्कार जपूया, माणूस घडवूया' या विषयावर त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्थेचे संचालक सुनील माने होते. यावेळी आमदार प्रवीण स्वामी, संस्थेचे सचिव पद्माकरराव हराळकर व सहसचिव डॉ. सुभाष वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना गुंजन पाटील म्हणाल्या की, आजच्या डिजिटल युगात समाजमाध्यमांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, समाजमाध्यमांना जीवनातील मूल्यांपेक्षा अधिक महत्त्व देणे योग्य नाही. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेचा स्वीकार करताना विवेक, संवेदनशीलता आणि संस्कार यांची सांगड घातली पाहिजे. शास्त्रज्ञ, विचारवंत आणि बुद्धिवादी व्यक्तींचे विचार समाजासमोर अधिक प्रभावीपणे आले पाहिजेत. मूल्ये आणि संस्कृती जपण्याची जबाबदारी केवळ महिलांची नसून पुरुषांनीही ती तितक्याच जबाबदारीने स्वीकारली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.तरुणांनी स्त्रीवादी तसेच सामाजिक आशयाच्या कवितांना प्रोत्साहन देऊन त्या अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. कवितेचा उद्देश केवळ मनोरंजन करणे नसून मनोरंजनातून प्रबोधनाकडे जाणे हा असला पाहिजे. साहित्य आणि कविता समाजातील दुरावा कमी करून माणसाला माणसाशी जोडण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकते, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, प्रा. शैलेश महामुनी, प्रा. समाधान पसरकल्ले, प्रा. शेखर. दाडगे, प्रा. प्रवीण जवळगेकर यांच्यासह शहरातील नागरिक प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर यांनी व्याख्यात्या गुंजन पाटील यांचा परिचय करून दिला. डॉ. ज्ञानोबा ढोबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. धनराज इटले यांनी आभार मानले.

## शासनाने धनुर्विद्येसाठी केली भरघोस तरतूद



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** धनुर्विद्या या पारंपरिक तसेच आधुनिक क्रीडा प्रकाराच्या विकासासाठी शासनाने यंदा भरघोस आर्थिक तरतूद केली असून, राज्यातील खेळाडू, प्रशिक्षक आणि धनुर्विद्या केंद्रांना याचा मोठा लाभ होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर यांनी दिली.धनुर्विद्येला अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात विविध स्तरांवर स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे आणि क्रीडा सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण व शहरी भागातील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांना राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.जालन्यात उद्या वरिष्ठ राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धादरम्यान, जालना येथे आयोजित महाराष्ट्र राज्य वरिष्ठ खुल्या धनुर्विद्या स्पर्धेचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. या स्पर्धेत राज्यभरातील धनुर्विद्या खेळाडू सहभागी होणार असून, उद्या सकाळी 11 वाजता इंडियन राऊंड धनुष्य प्रकारातील स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.इंडियन राऊंड हा भारतीय पारंपरिक धनुर्विद्येशी जोडलेला महत्त्वाचा प्रकार असून, या माध्यमातून भारतीय धनुर्विद्येची परंपरा आणि आधुनिक स्पर्धात्मक क्रीडा यांचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे.या स्पर्धेच्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीस साईचे माजी प्रशिक्षक श्री. प्रवीण शर्मा, जिल्हा धनुर्विद्या भीष्म असोसिएशनचे अध्यक्ष श्री. महेश सारस्वत, सचिव श्री. प्रकाश दुसेजा, स्पर्धा समितीचे संयोजक डॉ. हेमंत वर्मा तसेच राहुल सारस्वत प्रा डॉ राजेंद्र सोनवणे उपस्थित होते.जालना येथे होत असलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे जिल्ह्यातील धनुर्विद्या खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळणार असून, जालना हे धनुर्विद्येचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होण्यास या स्पर्धेची निश्चितच मदत होणार आहे.

## इकरा पब्लिक स्कूलला रग्बीत रौप्यपदक! 26 विद्यार्थ्यांना दहावी बोर्ड परीक्षेत क्रीडा कोट्यातून 5 गुणांचा लाभ



**जळगाव :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, जळगाव यांच्या अंतर्गत तसेच जळगाव जिल्हा रग्बी संघटनेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या शालेय रग्बी स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूलच्या 19 वर्षांखालील मुलांच्या संघाने दमदार कामगिरी करत रौप्यपदकावर आपले नाव कोरले.सागरपार्क मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूलने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत लॉर्ड गणेशा कॉलेज,जामनेर संघाचा पराभव केला आणि अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला.अंतिम सामन्यात इकरा पब्लिक स्कूलचा सामना के. आर. कोतकर शाळा, चाळीसगाव यांच्याशी झाला. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात के.आर.कोतकर शाळेने बाजी मारल्याने इकरा पब्लिक स्कूलला रौप्यपदक मिळाले.या यशामुळे इकरा पब्लिक स्कूलच्या मुलांच्या संघातील विद्यार्थ्यांना दहावीच्या बोर्ड परीक्षेत क्रीडा कोट्यातून 5 गुणांचा लाभ मिळणार आहे.यापूर्वी शाळेच्या मुलींच्या संघानेही रग्बी स्पर्धेत कांस्यपदक पटकावले होते. त्यामुळे मुलांच्या संघातील 14 आणि मुलींच्या संघातील 12 अशा एकूण 26 विद्यार्थ्यांना दहावी बोर्ड परीक्षेत प्रत्येकी 5 गुणांचा लाभ मिळणार आहे.इकरा पब्लिक स्कूलच्या या उल्लेखनीय यशामागे क्रीडा शिक्षक आमिर खान यांचे मोलाचे मार्गदर्शन, योग्य नियोजन तसेच खेळाडूंच्या कठोर परिश्रमांचा मोठा वाटा आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.करीम सालार,जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी विजयी संघातील सर्व खेळाडू,कर्णधार तसेच क्रीडा शिक्षकांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६

# महात्मा गांधींचा चष्मा : दृष्टी की दृष्टिकोन?

महात्मा गांधी म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर काही परिचित प्रतिमा उभ्या राहतात. हातात काठी, अंगावर साधे वस्त्र, चेहऱ्यावर शांत भाव आणि डोळ्यांवरचा साधा गोल चष्मा. गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचा हा चष्मा इतका परिचित झाला आहे की आज गांधींची प्रतिमा न दाखवता केवळ त्यांचा चष्मा दाखवला तरी अनेकांना लगेच गांधींची आठवण होते. काळाच्या ओघात हा चष्मा एका नव्या अर्थाने सार्वजनिक जीवनात आला. स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून गांधींच्या चष्म्याचे प्रतीक स्वच्छतेशी जोडले गेले आणि 'स्वच्छ भारत'ची कल्पना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचा वापर करण्यात आला. हे प्रतीक प्रभावीही ठरले. मात्र गांधींच्या चष्म्याचा अर्थ केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित ठेवला तर आपण गांधींच्या विचारविश्वाचा एक मोठा भाग दुर्लक्षित करतो. कारण गांधींच्या चष्म्याचे खरे महत्त्व त्याच्या काचांमध्ये नव्हते; त्या काचांमागून जगाकडे पाहणाऱ्या नजरेत होते. म्हणूनच गांधी जयंतीच्या निमित्ताने एक साधा पण अस्वस्थ करणारा प्रश्न विचारता येतो. आज गांधींचा चष्मा आपल्या डोळ्यांसमोर आहे; पण गांधींची दृष्टी आपल्या डोळ्यांत आहे का?

गांधींच्या काळातील भारत आणि आजचा भारत यांच्यात मोठे अंतर आहे. त्यांच्या काळात भारत परकीय सत्तेच्या अधीन होता. देशासमोर स्वातंत्र्य, दारिद्र्य, सामाजिक विषमता, अस्पृश्यता, ग्रामीण मागासलेपणा आणि धार्मिक तणाव यांसारखी आव्हाने होती. आज भारत स्वतंत्र आहे, लोकशाही व्यवस्था कार्यरत आहे आणि अर्थव्यवस्था, विज्ञान, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. स्मार्टफोन, इंटरनेट, डिजिटल व्यवहार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे मानवी जीवनाची गती बदलली आहे. जग एका क्लिकवर आले आहे. परंतु जग जवळ आले म्हणून माणसे अधिक जवळ आली आहेत का, हा प्रश्न अजूनही उरतो. माहितीचा वेग वाढला आहे; पण सत्य शोधण्याचे आव्हानही वाढले आहे. संवादाची साधने वाढली आहेत; पण मतभेदांमध्ये संवादाऐवजी तणाव आणि तिरस्कार वाढण्याची शक्यताही दिसते. विकासाची साधने वाढली आहेत; पण विकासाचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत समान प्रमाणात पोहोचतो आहे का, हा प्रश्न अद्याप महत्त्वाचा आहे.

याच ठिकाणी गांधींच्या चष्म्याचा अर्थ नव्याने समजून घेण्याची गरज आहे. गांधींची दृष्टी केवळ त्यांच्या काळातील प्रश्नांकडे पाहणारी नव्हती. ती माणसाला केंद्रस्थानी ठेवणारी होती. समाजाच्या शेवटच्या टोकावर उभ्या असलेल्या व्यक्तीचे जीवन कसे आहे, त्याला न्याय, सन्मान आणि संधी मिळते आहे का, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता. आज आपण विकासाची अनेक मोजमापे करतो. अर्थव्यवस्थेचा आकार, पायाभूत सुविधा, डिजिटल सुविधा, उत्पादन, गुंतवणूक किंवा तंत्रज्ञान. ही सर्व मोजमापे आवश्यक आहेत; परंतु त्याबरोबर एक साधा प्रश्नही आवश्यक आहे. या विकासाच्या प्रक्रियेत सामान्य माणसाचे जीवन किती बदलले?गांधींच्या चष्म्यातून पाहिल्यावर कदाचित हा प्रश्न अधिक स्पष्ट दिसतो. आज गांधींच्या चष्म्याची सर्वाधिक ओळख स्वच्छतेशी जोडली जाते. स्वच्छता ही निःसंशयपणे सार्वजनिक आरोग्य आणि सभ्य समाजासाठी आवश्यक आहे. परंतु गांधींच्या विचारातील स्वच्छतेचा अर्थ केवळ रस्ते किंवा परिसर स्वच्छ ठेवण्यापुरता मर्यादित नव्हता. स्वच्छता ही जीवनशैली, सार्वजनिक जबाबदारी आणि सामाजिक सन्मानाशी संबंधित होती. आज आपण बाह्य स्वच्छतेबद्दल मोठ्या प्रमाणावर बोलतो; परंतु सार्वजनिक वर्तनाच्या स्वच्छतेबद्दल किती विचार करतो? रस्त्यावर कचरा न टाकणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच समाजमाध्यमांवर अपप्रचार न करणेही महत्त्वाचे आहे. सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे जितके आवश्यक आहे, तितकेच सार्वजनिक संवाद द्वेष आणि अपमानापासून मुक्त ठेवणेही आवश्यक आहे. बाहेरची घाण दिसते म्हणून ती साफ करता येते; परंतु मनातील पूर्वग्रह, द्वेष आणि असहिष्णुता दिसत नसल्यामुळे त्यांची स्वच्छता अधिक कठीण असते. गांधींच्या चष्म्यातून पाहिले तर स्वच्छ भारताची कल्पना स्वच्छ समाजाच्या कल्पनेपर्यंत पोहोचते. गांधींच्या विचारातील सत्य आजच्या काळात आणखी महत्त्वाचे वाटते. गांधींसाठी सत्य हा केवळ नैतिक उपदेश नव्हता; तो त्यांच्या जीवनाचा आधार होता. आज माहितीचे प्रमाण इतके वाढले आहे की सत्यापेक्षा माहितीचा वेग अधिक महत्त्वाचा ठरताना दिसतो. एखादी बातमी खरी आहे की नाही यापेक्षा ती किती वेगाने पसरते, किती लोकांनी पाहिली किंवा किती लोकांनी पुढे पाठवली, याला अधिक महत्त्व मिळते. समाजमाध्यमांमुळे प्रत्येक व्यक्ती माहिती प्रसारित करू शकते. ही सुविधा लोकशाहीला नवे सामर्थ्य देते; पण त्याच वेळी जबाबदारीही वाढवते. गांधींच्या सत्याच्या विचाराचा आजच्या काळातील साधा अर्थ असा असू शकतो की आपल्याला आवडणारी माहिती आहे म्हणून ती खरी मानू नये आणि आपल्या मताविरुद्ध आहे म्हणून ती खोटी समजू नये. माहितीची पडताळणी करणे, असत्याचा प्रसार टाळणे आणि सार्वजनिक जीवनात सत्याला महत्त्व देणे ही आजची नागरिक जबाबदारी आहे. अहिंसेच्या बाबतीतही असेच आहे. गांधींच्या काळात अहिंसेचा वापर अन्यायाविरुद्ध संघर्षाच्या व्यापक साधन म्हणून झाला. आज हिंसेचे स्वरूप बदलले आहे. शारीरिक हिंसेबरोबर भाषेतील हिंसा, समाजमाध्यमांवरील अपमान, ट्रोलिंग आणि मतभिन्न व्यक्तीविषयी तिरस्काराची भाषा यांचाही विचार करावा लागतो. लोकशाहीत मतभेद अपरिहार्य आहेत. प्रत्येक व्यक्तीचा विचार एकसारखा असणे ही लोकशाहीची अपेक्षा नाही. उलट मतभिन्नतेतूनच सार्वजनिक चर्चा समृद्ध होते. मात्र मतभेदांचे रूपांतर द्वेषात होणे ही चिंतेची बाब आहे. गांधींच्या दृष्टीने विरोधकाचा पराभव करण्यापेक्षा त्याच्याशी संवाद साधणे अधिक महत्त्वाचे होते. आजच्या डिजिटल आणि वेगवान सार्वजनिक संवादात ही शिकवण अधिक महत्त्वाची ठरते. गांधींच्या चष्म्यातून पाहताना आपल्या विकासाच्या संकल्पनेकडेही नव्याने पाहावे लागते. आज आर्थिक प्रगती, शहरीकरण आणि तंत्रज्ञान यांना विकासाचे महत्त्वाचे निर्देशक मानले जाते. त्यात काहीही चुकीचे नाही. परंतु विकासाची किंमत काय आहे, हा प्रश्नही विचारला पाहिजे. नैसर्गिक संसाधनांवर वाढता दबाव, प्रदूषण, पाण्याचे संकट आणि हवामानातील बदल यामुळे जगासमोर गंभीर आव्हाने उभी आहेत. गांधींचे साधेपणाचे जीवन आजच्या संदर्भात यासाठी महत्त्वाचे ठरते की त्यांनी गरज आणि हव्यास यांच्यात फरक करण्याचा आग्रह धरला. आधुनिक जीवनातील सर्व सुविधा नाकाराव्यात असा त्यांचा अर्थ घेण्याची आवश्यकता नाही; परंतु सुविधा वाढताना जबाबदारीही वाढली पाहिजे. पृथ्वीच्या संसाधनांचा वापर करताना पुढच्या पिढ्यांचा विचार केला पाहिजे. हा विचार गांधींच्या साधेपणाला आधुनिक पर्यावरणीय संदर्भ देतो. गांधींच्या चष्म्याची खरी परीक्षा मात्र आपल्या दैनंदिन जीवनात होते. गांधी जयंतीच्या दिवशी आपण त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतो, स्वच्छता अभियानात सहभागी होतो, भाषणे ऐकतो आणि गांधींचे सुविचार समाजमाध्यमांवर प्रसारित करतो. हे सर्व आवश्यक आणि स्वागतार्ह आहे. पण दुसऱ्या दिवशी आपण पुन्हा पूर्वीसारखेच वागलो तर त्या स्मरणाचा अर्थ किती उरतो? गांधींच्या विचारांचे खरे स्मरण एखाद्या कार्यक्रमाच्या कालावधीत होत नाही; ते आपल्या छोट्या-छोट्या कृतींमध्ये दिसते. आपण चुकीची माहिती पुढे पाठवत नाही, मतभिन्न व्यक्तीचा सन्मान राखतो, सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेतो, गरजेपुरताच उपभोग करतो, दुर्बल व्यक्तीशी सन्मानाने वागतो किंवा आपल्या कामात प्रामाणिक राहतो—तेव्हा गांधींचा विचार आपल्या जीवनात प्रवेश करतो. म्हणून गांधींच्या चष्म्याला केवळ स्वच्छतेचे प्रतीक मानणे अपुरे ठरेल. तो एक प्रश्न बनू शकतो. आपण समाजाकडे कोणत्या दृष्टीने पाहतो? आपल्याला फक्त स्वतःचे हित दिसते की समाजातील शेवटचा माणूसही दिसतो? आपल्याला आपल्या मताचा विजय महत्त्वाचा वाटतो की सत्याचा शोध? आपल्याला विकासाचा वेग दिसतो की त्या विकासाची सामाजिक आणि पर्यावरणीय किंमतही दिसते? कदाचित म्हणूनच गांधींच्या चष्म्याचा सर्वात महत्त्वाचा अर्थ 'दृष्टी'पेक्षा 'दृष्टिकोन' असा आहे. चष्मा डोळ्यांना स्पष्ट दिसायला मदत करतो; पण काय पाहायचे आणि कसे पाहायचे हे ठरवतो तो दृष्टिकोन. गांधींची खरी देणगी हीच दृष्टी होती—माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याची, सत्याकडे सत्य म्हणून पाहण्याची आणि विकासाकडे नैतिक जबाबदारीने पाहण्याची. आज गांधींचा चष्मा आपल्या सभोवती सर्वत्र दिसतो. पण त्यातून दिसणारे जग आपण पाहतो आहोत का, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. गांधींच्या चष्म्याची प्रतिकृती बनवणे सोपे आहे; गांधींच्या दृष्टीची प्रतिकृती बनवणे कठीण आहे. कारण त्यासाठी बाहेरचे काही बदलण्यापूर्वी स्वतःच्या नजरेत बदल करावा लागतो. गांधींचा चष्मा त्यांच्या डोळ्यांवर होता; आज तो आपल्या हातात प्रतीक म्हणून आहे. आता प्रश्न एवढाच, तो आपण फक्त पाहण्यासाठी ठेवणार आहोत की त्यातून समाजाकडे नव्या दृष्टीने पाहणार आहोत? कदाचित गांधी जयंतीचा खरा अर्थ याच एका प्रश्नात सामावलेला आहे. चष्मा गांधींचा आहे; पण दृष्टी आपली कशी असावी?



**सुनील भारोडकर**
**नाशिक**




**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६

# आग्यामोहोळ - सम्यक विद्रोहाची मर्मग्राही अस्सल गझल




कवीस्नेही गझलकार आत्तम गेंदे परभणी जिल्ह्यातील पुयणी पालम हे गावं.पानं उलटतात आयुष्याचे आई आठवत राहते.तसेचं एक पानं आईसाठी अर्पण म्हणून येते.बालपणीच्या अलगद ओठी भाव मायेचे होते."हे आठवले ते आठवले,हे मी तुलाच सांगत होतो...तुझी आठवण येते आई 'हे मी कुणास सांगू आता" हा मनाचा हळवा कप्पा कापूर होऊन जळत राहतो.आत्तम गेंदे यांची गझल ही अस्सल वेदनेची सल उजागर करते.तथागत भगवान गौतम बुद्ध व बौध्दीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी घेऊन ही गझल तितक्याच सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाने माणुसकीच्या धम्म विचारांचे धारदार निर्धारक प्रबोधन करण्यासाठी ही गझल आली आहे.यातील मतला शेर तितक्याच संवेदना सृजनतेने मुक्त होऊन येते."अशी लागली हृदयावरती गझलेची ही ओळ पुन्हा जागे झाले हृदयामध्यले आग्यामोहोळ पुन्हा"...(पृ.२३)ही या गझलेची वेदनीची ठणक आहे.ही आत्तम गेंदेंची गझल ओंजळभर नितळ निळाई घेऊन आलेली आहे.तथागत ज्या पिंपळ वृक्षाखाली बसले होते.या देहाला मनःशांती लाभली पाहिजे म्हणजे मोहा पासून दुर जा माया प्रेम आपुलकी जिव्हाळा म्हणजे मनुष्य देहाची कांती आहे.तो शेर असा "ज्या झाडाच्या खाली दिसले बुद्ध तुला बसलेले.तिथे आश्रित एक दिसणार आग्यामोहळ तुला"(पृ.५६)समकालीन वास्तवाचे सम्यक दृष्टीने समर्पक समृद्ध सकारात्मक विचारधारेची पेरणी करणारी ही गझल आहे.आग्यामोहोळ ही प्रतिमा अतिशय आशय संपन्न आहे.मद मोह तर आहेच पण जो विखारी दंश आहे तो मरणयातना देतो.ही गझल इथल्या अस्वस्थ समाज व्यवस्थेवर प्रचंड संयत मनोभूमिकेतून प्रहरा करते.कारण 'मी सूर्याचा वंशज आहे, म्हणून काजवा झालो नाही ' फुले शाहू आंबेडकरी वैचारिक विचारांचे अधिष्ठान ही गझल देऊन जाते.इथल्याजात व्यवस्थेवरचा माणूस म्हणूनच आपण माणुसकीचा झरा कायम राखला पाहिजे.इथे अजूनही जातीपातीचे राजकारण, दंगली,जातीवरचे छळ,भाषेवरचे बळ, आडनावावरून जात खोदून काढल्या जाते.जी जात नाही ती जातं शोधणारी माणसाची हलकटवृत्तीवर प्रचंड प्रहार करणारी हा शेर "माझे, तुझे,तिचेही माणूस नावं आहे.जातीवरुन का मग इतका तनाव आहे?जातीवरुन छळते, भाषेवरून छळते शहरातही तुझ्या या मागास गावं आहे(पृ.२४) या गझलेची सम्यक दृष्टी दिली आहे.जितकी शिकली तितकी पुन्हा जातीयता वाढली आहे.एक शेर असा."आडनावांची कशाला बनविता यादी वगैरे...?शोधल्या जातात मग आपापल्या जाती वगैरे...!(पृ.२५)हीसंयत विद्रोही अस्सल मनोभूमिका आहे.गुलामीलाच आझादी मानणारी ही व्यवस्था ही कोणतीच क्रांती करणार नाही.अंधश्रध्दा वरवरून मान्य नाही पण काही लुचे चेलेमहापुरुषांच्या स्मारकांची शांती पुजा वगैरे करतील ही सखेद वेदनेची भंयकर उद्विग्नता ही गझल देऊन जाते.आजच्या शिकल्या आणि अज्ञानी स्त्रीयांची सहनशीलतेची वेदना ही तितक्याच प्रखरपणे मांडली आहे.ती गुलाबी जन्म मागणार नाही कारण तिला जन्मभर काट्याचा सहवास आहे.तिच्या मौनाचा आवाज हा हुंकार वेदनेचा आहे.तिच्या शालीनतेचे कौतुक होईल.पण पदर ढळता कामा नये.कारण निष्पाप डोळ्याचा इथे कुणी राहिला नाही.अशी सखेद वेदनेची ही ही गझल आहे.काळजाला जिभाळी लावून जाणारी, गोष्ट छोटीशी असलीतरी जिव्हारी लागते.आजच्या बातम्यांवर तेवढा विश्वास राहिला पण इथे मिडियाच्या अफवा सन्नाट पसरली जाते.या कोरड्या शेतात कुरुडू लावला की पऱ्हाट्या पेरल्या.इथल्या झोपडपट्टीला रात्रभर झोप नाही.बंगला दुपारी गाड झोपला आहे.जातीमुळे देशभक्तीची शंका घेणारी इथली बांडगूळी व्यवस्था म्हणून ही व्यवस्था आमच्या गुणवत्तेवरही शंका घेते जसे.*"सिध्द नाही व्हायची ईमानदारी आमचीपात्रता फेरीतसुध्दा लाच द्यावी लागते...!घेतली जातेय शंका आमच्या जातीमुळे देशभक्ती सिध्द करुनी दाखवावी लागते "*(पृ.२७)अशी ही प्रंचड संयत विद्रोही मनोभूमिकेतून शब्दांची अस्सल सल व्यक्त करीत ही गझल मोठा आशय घेऊन आली आहे.आजचे समाजकारण राजकारण फक्त निवडणुकीपुर्ते विकास,फक्त नावपुर्ता.या गझलेने समकाल अतिशय विदारकतेने चित्रित केला आहे.मुळनिवाशी भारतीयांना प्रजासत्ताक संविधानाचे मूल्य दिले.युगांची गुलामगिरी ही लाचरी होती यातून मुक्तता मिळाली.तथागत बुद्धांची पिंपळ सावली मिळाली.तुला साहेब होण्याचा हक्क मिळाला.चवदार तळ्याचा संदर्भ अतिशय अप्रतिम.या तहानेने बारव बाटले कधीकाळी.म्हणून ही गझल निर्धाराचे सत्य शब्दशस्त्र उगारून जाते ते असे."तुला या संविधानाने दिला अधिकार चालण्याचा तुझ्या पायात जुलमी साखळी होती कधीकाळी"(पृ.३०)माणूसकीचा गहिवर घेऊन मानवी मूल्यांची जोपासना करणारी ही गझल आहे.कवी गझलकार आत्तम गेंदे हेविनय विवेकी विचारधारेचे पाईक आहेत.वाचन चिंतन मनन हा अनुबंध असल्याने ते म्हणतात "मी सूर्याचा वंशज आहे, म्हणून काजवा झालो नाही"स्वतंत्र आहे माझा साचा,क्लोन कुणाचा झालो नाही"(पृ.३२)हे धारदार निर्धाराची ध्येयासक्ती घेऊन येणारी ही गझल मनाचा तळ ढवळून काढते.तो असा "जात बदलता येईना.. मी आडनाव बदलू का?"(पृ.३४)हे सत्य नाकारता येत नाही.आज सावित्रीमाई च्या लेकी म्हणून वावरताना अजून तिच्यावराचा अन्याय अत्याचार थांबला नाही.आजचे समकालीन सम्यक सत्य असेच आहे त्याची जातं पाहिली जाते.त्यांने दिल्ली तख्त गाजविले.एक शेरअसा "बातमी समजते आम्हांला पराक्रमाची नंतर परंतु त्याही आधी त्याची जात कळवली जाते एखादे अक्षर गिरवावे तशी गिरवली जाते..जन्मापासून आपापली जात शिकवली जाते!(पृ.५२)एक अदिम सत्य या गझलेने दिले ते म्हणजे जखम भरण्यासाठी हळद लावल्या जाते.तशी लग्नाआधी हळद लावल्या जाते.कारण दोन जीवांच्या आयुष्यभराच्या जखमा भरून निघाल्या पाहिजे.हा चिंतन आशय मनस्वी आहे.धर्मनिरपेक्षतेचा कितीही धूर केला पण हे जातीयवादी आग्यामोहोळ धर्माच्या फांदीला बसलेतर डसल्याशिवाय राहत नाही म्हणून तथागतांच्या सम्यक संबुध्दांच्या वृक्षाखाली तू विचारांचा साधक हो!हे सत्यता ही गझल देऊन जाते. डॉ.बाबासाहेबांनी सर्वहरा समाजाच्या उन्नतीसाठी संविधान दिले म्हणून काळोख दुर झाला.तो शेर असा,"स्वतः उजळून भीमाने मिटवली रात्र कायमची.मिळाला सूर्य दुनियेला जो कधी मावळला नाही"(पृ.७०)आंबेडकरी गझलांचा आत्तम श्वास आहे त्यांचे अक्षर जगणे कारणी लागले.या गझलेची निस्सीम निळाईची शक्ती आहे ती अशी बा भीमा सारखा बाप,भीम शिकला कसा?दुर चंद्रासारखा फळा होता.या कर्मकांडातून धम्माने वाचवले ते खरे ज्ञान दृष्टीचे औषध.खरे वाघीणीचे दुध दिले रे बाबा,पण आजचे ताट चाटणारे मांजर.काल मुजरे करीत होते.पण आज सायबा सारखा वाग, म्हणून ही गझल वाचा "का तुला वाटते लाज जयभीमची,भीम दिसतो मला भास्करासारखा.विषमतेचा इथे रोग होता जुना वैद्य मज भेटला गौतमासारखा!"(पृ.७१) माणूस म्हणून एक घरटं असतं ती आई माई बाई असते ती सृजनशील स्नेहाळू भावनेची आई या गझलेत आहे.आईत विठ्ठल दिसने ही एक अमोघ अलौकीक भावबंध आहे.तर लेकरू होऊन ही गझल अशी "तुझ्या निर्वाण दुःखाचे इथे होणार बघ आत्तम.अता बुद्धास भेटाया तुझ्याही चालल्या जखमा"..(पृ.८३)पक्ष बदलने सहज सोपे आहे तसे जात बदलने सोपे व्हावे आता.आजच्या समकालीन वास्तवाचे सम्यक भान ही गझल देऊन जाते.आपल्या मनोगत ऋणाईत ते लिहितात "महाकवी श्रध्देय वामनदादा कर्डक यांची गाणी लहानपणापासून ऐकत होतो.पण नंतर गझलेच्या दृष्टीने ती ऐकू लागलो.आणि त्यातूनही लय,यती, आशय याबाबतीत खुप काही शिकलो.भीमराव पांचाळे ते डॉ राजरणधीर यांच्या पर्यंत ऋणाई व्यक्त केली आहे.तरआत्माराम जाधव (आत्मा) शब्दस्नेही म्हणून लिहितात "प्रेम आणि करुणा सोबत घेऊन चालणारी समतेच्या मार्गावरील शब्दांची आग्यामोहोळ -सामाजिक प्रश्नांवर मारलेला घनाघाती घाव, कौटुंबिक नात्यांमधील नाजूक भावनिकता आणि प्रेमातील अबोल समजूतदारपणा, अल्लड अवखळ प्रांजळपण,..या सर्व छटा त्यांच्या गझलातून अतिशय परिपक्वतेने उतरल्या आहेत.सामाजिक समस्यांवर घाव घालणारी त्याची गझल अतिशय सभ्य, सौम्य भाषेत व्यक्त होत जाते.त्याच्या प्रत्येक शेरात त्याच्या जगण्याचा अनुभव आणि अभ्यासूवृत्ती स्पष्ट जाणवते (पृ.१५आत्मा) तर नितीन देशमुख शुभेच्छा देताना "आत्तम गेंदे यांची गजल या विवक्षित भावभावनांची अस्वस्थ करणारी गुंफण आहे.ती जेवढी हळवी तरलं आहे,तेवढी ती मानवतेचा हट्ट धरणारी आहे.जातिअंताची मागणी करणारी आहे..तर उर्मिला बांदिवडेकर (दिवाणकार)"तुम्ही तुमच्या संग्रहाचे नाव 'आग्यामोहोळ'ठेवलेत.हे नावच तुमच्या सृजनाची ओळख आहे तुमच्या शेरात जे आहे तेच या नावात आहे.'जागे झाले हृदयामधले आग्यामोहोळ पुन्हा'हा शेर म्हणजे या संग्रहाचा आत्मा आहे.गझल एकदा डसली की,ती आयुष्यभर सोडत नाही त्या डसण्यात गोड वेदना आहे (पृ.१०) ख्यातनाम शाहिर सुरेशकुमार वैराळकर यांची पाठराखण अतिशय शब्दसावली होऊन आली आहे ती अशी आंबेडकरी गझलेतील आस्वासक स्वर असे संबोधले आहे."आत्तम गेंदे यांच्या गझलांमध्ये केवळ प्रेम नाही.त्यांची गझल समाजातील विसंगतीवर,गरिबीवर व सर्वसामान्यांच्या संघर्षावर थेट भाष्य करते.आजूबाजूच्या वास्तवाचे चटके त्यांच्या शेरामध्ये प्रकर्षाने जाणवतात.उपरोधिक आणि टोकदार शैलीत सामाजिक व्यवस्थेवर बोट ठेवणे हे त्यांच्या गझलेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.आत्तम गेंदे यांना मनापासून शुभेच्छा!(ब्लर्ब) अस्वस्थ वेदनीची मनमस्तिष्कांत एक पिंपळ पान हे ख्यातनाम चित्रकार संतोष धोंगडे याचे चिंतन आशय संपन्न मुखपृष्ठ आशय संपन्न झाले आहे.गझलकार आत्तम गेंदे जी.

**पुस्तकः-आग्यामोहोळ (मराठी गझलसंग्रह)गझलकारः-आत्तम गेंदे. पुयणी ता.पालमप्रकाशकः-स्वयं प्रकाशन सासवड,पुणे.मुखपृष्ठः-संतोष धोंगडे पहिली आवृत्तीः-२७ सप्टेंबर २०२६किंमतः-२०० रूपये पुस्तक**



**परिचयः- डॉ प्रभाकर शेळके,जालना**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६


# चौका गाव बनतंय शेतकरी चळवळीचे केंद्र



**छत्रपती संभाजीनगर :** शहरापासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर वसलेले चौका हे गाव आज केवळ एक गाव राहिलेले नाही, तर ते एका नव्या चळवळीचे प्रतीक बनत चालले आहे. इतिहास, निसर्ग, संस्कृती आणि संघर्ष या चारही प्रवाहांचा संगम जिथे होतो, ते ठिकाण म्हणजे चौका. निजामशाहीच्या काळात या ठिकाणी निजामाची महत्त्वाची चौकी होती आणि त्या चौकीवरूनच या गावाला चौका हे नाव पडले, असे येथील जेष्ठ नागरिक सांगतात. या एका नावातच या गावाचा शेकडो वर्षांचा इतिहास दडलेला आहे. निजामाच्या राजवटीपासून ते स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत अनेक घडामोडींनी हे गाव पाहिल्या आहेत, पण या गावाने आपले अस्तित्व आणि आपली ओळख नेहमीच टिकवून ठेवली आहे.या गावाला निसर्गाने भरभरून दिले आहे. चौका परिसर हा खऱ्या अर्थाने नद्यांचे माहेरघर आहे. येथूनच सुखना, दुधना आणि लहुकी या तीन महत्त्वाच्या नद्या उगम पावतात. ज्या मातीतून नदी जन्म घेते, ती माती किती सुपीक आणि पवित्र असावी, याची कल्पना आपण करू शकतो. या नद्यांनीच या परिसरातील शेकडो गावांची तहान भागवली आहे. मात्र गेल्या काही वर्षांत या नद्यांची अवस्था चिंताजनक झाली आहे. उगमस्थानाकडेच पाणी आटत चालल्याने पुढच्या गावांपर्यंत पाणी पोहोचत नाही. याच परिसरात लोकुत्तरा हे जागतिक पातळीवर ओळखले जाणारे बौद्ध विहार आहे, जिथे देश-विदेशातून अभ्यासक आणि पर्यटक येत असतात. तसेच सारोळा हे ठिकाण तर निसर्गाच्या कुशीत वसलेले एक रमणीय स्थळ आहे, जिथे पावसाळ्यात धबधबे आणि हिरवाईने नटलेले डोंगर मनाला भुरळ घालतात. गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले जागृत म्हसोबा मंदिर हे गावकऱ्यांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. प्रत्येक सण-उत्सव, प्रत्येक सुख-दुःखात गावकरी याच मंदिरात एकत्र येतात. त्यामुळे या गावात एक वेगळीच सांस्कृतिक परंपरा आणि एकोपा आजही टिकून आहे.राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही चौका परिसराने आपला ठसा उमटवला आहे. येथील दगडूभाऊ वाघ, सरसाबाई वाघ, माधवराव पा. घुगे, संगिता वाघ यांनी पंचायत समितीचे सभापती म्हणून काम पाहिले आहे आणि या भागाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या कार्यकाळात अनेक विकासकामे झाली, पण तरीही या भागाचा मूलभूत प्रश्न आजही कायम आहे तो म्हणजे शेती आणि शेतकऱ्याचा प्रश्न.चौकाचा भूभाग हा नैसर्गिकरित्या डोंगराळ आणि बरड आहे. काळी कसदार जमीन येथे फार कमी आहे. त्यामुळे शेतीतून मिळणारे उत्पन्न हे अत्यंत तुटपुंजे आहे. पावसाचे प्रमाणही या भागात नेहमीच कमी राहिले आहे. सरासरीपेक्षा कमी पाऊस, वेळेवर पाऊस न येणे आणि आला तर अतिवृष्टी होणे, या दुष्टचक्रात येथील शेतकरी अडकला आहे. त्यामुळे केवळ शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे येथील शेतकऱ्याला शक्य होत नाही. म्हणूनच या परिसरातील अनेक कुटुंबे दुध व्यवसायाकडे वळली आहेत. सकाळी पहाटे उठून दूध काढणे, ते शहरात नेऊन विकणे, हा त्यांच्या दिनक्रमाचा भाग झाला आहे. शहरात गेल्यावर तुम्हाला चौका परिसरातील अनेक महिला आणि तरुण हातात करवंदाच्या टोपल्या, जांभळं, ताजे दूध आणि दही घेऊन विकताना दिसतील. ही माणसं अतिशय मेहनती, कष्टाळू आणि स्वाभिमानी आहेत. कोणापुढे हात न पसरता आपल्या घामावर जगणारी ही माणसं आहेत. पण त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळत नाही. शेतमजुरांचे प्रश्न, मजुरीचा प्रश्न, हमीभावाचा प्रश्न आजही प्रलंबित आहे.आता या सर्व प्रश्नांमध्ये आणखी एका गंभीर प्रश्नाची भर पडली आहे आणि तो म्हणजे नियोजित खानदेश एक्सप्रेस. या महामार्गाचे काम जर याच भागातून गेले तर अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी यात जाणार आहेत. ज्या तुटपुंज्या जमिनीवर त्यांचे कुटुंब जगते, तीच जमीन जाणार म्हटल्यावर शेतकरी चिंताग्रस्त होणे स्वाभाविक आहे. जमीन गेली तर करायचे काय, या विचाराने अनेकांच्या झोप उडाली आहे. शासनाकडून योग्य मोबदला मिळेल की नाही, पुनर्वसन कसे होणार, या प्रश्नांची उत्तरे कोणाकडेच नाहीत.या सगळ्या पार्श्वभूमीवर येथील शेतकरी आता जागा झाला आहे. सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती, त्रैमासिक तिफण आणि शिवार संसद या तीन संघटनांनी या भागात सातत्याने काम सुरू केले आहे. त्यांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांच्या बैठका घेतल्या, त्यांचे प्रश्न समजून घेतले. मृग नक्षत्राच्या पार्श्वभूमीवर शिवारातच तिफण मृगोत्सवाचे आयोजन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना थेट बांधावर वाचा फोडली. केवळ चर्चा न करता त्यांनी शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वेळोवेळी निवेदने दिली, अधिकाऱ्यांशी संवाद साधला. खानदेश एक्सप्रेसच्या प्रश्नावर तर त्यांनी तिफण लोक अदालत घेऊन या प्रश्नाला एका व्यापक जनचळवळीचे स्वरूप दिले. या लोक अदालतीत शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या, आपल्या जमिनीचा सातबारा हातात घेऊन आपली बाजू मांडली.या प्रयत्नांमुळे आज चित्र बदलत आहे. येथील शेतकरी, युवक आणि कार्यकर्ते आता गप्प बसायला तयार नाहीत. ते आता आपल्या न्याय हक्काची भाषा बोलू लागले आहेत. अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची तयारी त्यांनी ठेवली आहे. या लढाईत त्यांना सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समितीची भक्कम साथ लाभत असून सर्व शेतकरी कार्यकर्ते आता एका छत्राखाली एकत्र येऊ लागले आहेत. ही एकजूटच या चळवळीची खरी ताकद आहे.आगामी काळात या भागात केवळ आंदोलन आणि संघर्षावर भर न देता अनेक विधायक आणि सृजनशील उपक्रम राबविण्याचा मानस आहे. येथील रानमेव्याला बाजारपेठ मिळावी म्हणून करवंद महोत्सवाचे आयोजन करण्याचा विचार आहे. जेणेकरून येथील करवंद, जांभूळ देशभरात ओळखले जाईल. तसेच येथील निसर्गरम्य परिसराचा उपयोग करून कृषी पर्यटन केंद्र विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे, जेणेकरून शहरातील लोकांना येथे येता येईल आणि शेतकऱ्यांना उत्पन्नाचे एक नवे साधन मिळेल. तरुणांना शेतीतच रोजगार मिळावा यासाठी शेतकरी प्रशिक्षण आणि व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. शासनाच्या आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या योजना या दुर्गम भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी शेतकरी संघर्ष समिती अहोरात्र कार्यरत असून लोक आता संघटित होऊ लागले आहेत.यावर्षी तर दुष्काळाने कहरच केला आहे. पावसाने पाठ फिरवल्यामुळे पीक पाणी पूर्णपणे गेले आहे. पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, जनावरांना चारा नाही, शेतमजुरांच्या हाताला काम नाही, त्यामुळे गावातून शहराकडे स्थलांतर वाढू लागले आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी भरण्याइतकेही पैसे अनेक कुटुंबांकडे नाहीत. या सर्व प्रश्नांवर सखोल चर्चा आणि विचार विनिमय करून त्यावर ठोस उपाय शोधण्यासाठी आणि शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी चौका येथे येत्या रविवारी ४ ऑक्टोबर २०२६ रोजी एका भव्य दुष्काळ व पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत शेती, पाणी आणि शेतकरी प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या वेदना आणि भावनांना वाचा फोडणारे कवी संमेलन आणि संत भगवान बाबा कलामंचाचा प्रबोधनपर कार्यक्रमही याच ठिकाणी होणार आहे.म्हणूनच आज चौका परिसर हा केवळ एक भौगोलिक प्रदेश राहिला नसून तो आगामी काळात सामाजिक, सांस्कृतिक आणि शेतकरी चळवळीचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून पुढे येत आहे. ही दुष्काळ व पाणी परिषद निश्चितच ऐतिहासिक होणार असून सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरणार आहे. या परिषदेत सर्व शेतकरी, शेतमजूर, कार्यकर्ते, सरपंच आणि सोसायटी चेअरमन यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या हक्काची लढाई अधिक बळकट करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

**डॉ. शिवाजी हुसे**
**संयोजक : दुष्काळ व पाणी परिषद, चौका**

# कंटेकुर येथे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा; ज्येष्ठांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना मिळाली जीवनमूल्यांची प्रेरणा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** :ज्येष्ठांविषयी आदर, कृतज्ञता आणि आपुलकीची भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजावी, तसेच त्यांच्या समृद्ध अनुभवातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने कंटेकुर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत गुरुवारी (ता. 1) रोजी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन' अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळकरी मुलांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ व शुभेच्छा देत ज्येष्ठांविषयीचा आदर व्यक्त केला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची अधिकृत सुरुवात झाली. मुख्याध्यापक पटणेयावेळी मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे यांनी, "ज्येष्ठ व्यक्ती हा कुटुंबाचा अनुभवसंपन्न आधारस्तंभ असतो. त्यांचे विचार, संस्कार, परंपरा आणि ज्ञान पुढील पिढीसाठी नेहमीच मार्गदर्शक ठरतात. ज्येष्ठांचा सन्मान करणे, त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि त्यांना आधार देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे," असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनीही भाषणे, कविता आणि मनोगतांच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या.कार्यक्रमात उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या आयुष्यातील सुख-दुःखाचे व संघर्षाचे प्रसंग मांडले. कष्ट, प्रामाणिकपणा, शिस्त, वेळेचे नियोजन, व्यसनांपासून दूर राहणे आणि संस्कारक्षम जीवन जगण्याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. या संवादात विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या आजी-आजोबांची नियमित विचारपूस करण्याचा आणि त्यांचा सन्मान राखण्याचा सामूहिक संकल्प केला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीची भावना दृढ झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजयकुमार कलशेट्टी यांनी केले. यशस्वीतेसाठी जीवन सूर्यवंशी, लक्ष्मण येवते, लतिफ लदाफ, चित्ररेखा दंडे, लक्ष्मीबाई शिकारे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी ज्येष्ठ नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६

# अहिंसा : माणुसकीची सर्वोच्च भाषा- डॉ. राजेंद्र बगाटे

दि. २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून जगभर पाळला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने १५ जून २००७ रोजी दरवर्षी २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला. अहिंसेचा संदेश शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून व्यापक समाजापर्यंत पोहोचविणे, तसेच शांतता, सहिष्णुता, परस्पर समज आणि अहिंसेची संस्कृती विकसित करणे हा या दिनामागील प्रमुख उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या ठरावात अहिंसा, सहिष्णुता, मानवी हक्क, मूलभूत स्वातंत्र्य, परस्पर समज आणि विविधतेचा आदर ही मूल्ये परस्परांशी जोडलेली असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा दिवस न राहता हिंसेऐवजी संवाद, संयम आणि परस्पर सन्मान स्वीकारण्याचा संकल्प करण्याची संधी ठरतो.अहिंसा म्हणजे केवळ मारहाण न करणे किंवा शस्त्रांचा वापर टाळणे एवढाच मर्यादित अर्थ नाही. अहिंसा ही मन, वाणी आणि कृती यांना जोडणारी जीवनदृष्टी आहे. मनात द्वेष, सूड, तिरस्कार आणि दुसऱ्याला कमी लेखण्याची भावना वाढू न देणे हे तिचे पहिले पाऊल आहे. हिंसेची सुरुवात अनेकदा कृतीतून होत नाही; तिची बीजे विचारांत रुजतात. एखाद्याविषयी सतत तिरस्कार बाळगणे, त्याला शत्रू समजणे किंवा त्याच्या अस्तित्वालाच नाकारणे यामुळे पुढे कठोर शब्द आणि आक्रमक कृती जन्म घेऊ शकतात. म्हणून अहिंसेची खरी सुरुवात अंतर्मनाच्या शुद्धीकरणातून होते. स्वतःच्या रागावर, द्वेषावर आणि प्रतिक्रियांवर नियंत्रण ठेवणे म्हणजे अहिंसेच्या दिशेने जाणे होय.अहिंसेचा सर्वाधिक दैनंदिन संबंध वाणीशी येतो. शब्दांना शरीर नसते, पण ते मनावर खोल जखमा करू शकतात. शिवीगाळ, धमकी, उपहास, अपमानास्पद भाषा किंवा जाणीवपूर्वक दुसऱ्याच्या भावनांना दुखावणे ही मानसिक हिंसेची रूपे आहेत. त्यामुळे अहिंसक वाणी म्हणजे केवळ गोड बोलणे नव्हे; तर सत्य आणि असहमती व्यक्त करतानाही समोरच्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आदर करणे होय. एखाद्याच्या विचारांचा विरोध करता येतो, चुकीच्या कृतीवर टीका करता येते आणि कठोर प्रश्नही विचारता येतात; मात्र त्यासाठी व्यक्तीचा अपमान करण्याची गरज नसते. विचारांशी असहमती असली तरी व्यक्तीचा सन्मान राखणे हीच अहिंसक संवादाची खरी कसोटी आहे.अहिंसा ही दुर्बलतेची नव्हे, तर आत्मसंयमाची खूण आहे. रागाच्या क्षणी तात्काळ प्रतिक्रिया न देणे, अपमानाला प्रतिहल्ल्याने उत्तर न देणे आणि संघर्षाच्या वेळी विवेकाने निर्णय घेणे यासाठी मनाची ताकद आवश्यक असते. हिंसक प्रतिक्रिया क्षणिक समाधान देऊ शकते; परंतु त्यामुळे संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता असते. अहिंसा मात्र संघर्षाच्या मुळाशी जाण्याची संधी देते. मतभेद का निर्माण झाला, समोरच्या व्यक्तीची भूमिका काय आहे आणि तो प्रश्न संवादातून कसा सोडविता येईल, याचा विचार करण्यास ती प्रवृत्त करते. त्यामुळे अहिंसा म्हणजे निष्क्रिय राहणे नव्हे, तर संयमित आणि सजग पद्धतीने कृती करणे होय.माणसामाणसांत मतभेद असणे स्वाभाविक आहे. प्रत्येकाची विचारसरणी, अनुभव, गरजा आणि जीवनदृष्टी वेगळी असते. समस्या मतभेदांत नसते; ती मतभेदांचे रूपांतर द्वेष आणि वैरात झाल्यावर निर्माण होते. अहिंसा मतभेद नष्ट करण्याचा आग्रह धरत नाही, तर त्यांना मानवी चौकटीत हाताळण्याची शिकवण देते. दुसऱ्याचे म्हणणे ऐकणे, स्वतःच्या भूमिकेचा पुनर्विचार करण्याची तयारी ठेवणे, सामंजस्याचा मार्ग शोधणे आणि मतभिन्नतेनंतरही परस्पर सन्मान टिकविणे ही अहिंसक वृत्तीची लक्षणे आहेत. त्यामुळे अहिंसा ही सर्वांनी एकमताने राहण्याची सक्ती नसून विविध मतांना सहअस्तित्वाची जागा देणारी मूल्यव्यवस्था आहे.अहिंसा आणि क्षमा यांचेही अतूट नाते आहे. क्षमा म्हणजे अन्याय किंवा चुकीचे वर्तन योग्य ठरविणे नव्हे. चुकीचा विरोध करतानाही सूडभावना टाळता येते. एखाद्याने आपल्याशी चुकीचे वर्तन केले म्हणून त्याच्यावर तसाच अन्याय करण्याची आवश्यकता नसते. सूड संघर्षाची साखळी पुढे नेतो, तर क्षमा ती साखळी तोडण्याची शक्यता निर्माण करते. अर्थात, क्षमेसोबत विवेक आवश्यक आहे. अन्यायाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आवश्यक सीमा आणि उपाय कायम ठेवूनही मनातील वैर कमी करता येते. त्यामुळे क्षमा ही अहिंसेच्या भावनिक आणि नैतिक शक्तींपैकी एक आहे.अहिंसेच्या केंद्रस्थानी करुणा आणि सहवेदना आहेत. दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे, त्याच्या परिस्थितीचा विचार करणे आणि त्याच्याकडे संवेदनशीलतेने पाहणे म्हणजे करुणा. जेव्हा माणूस समोरच्याला केवळ विरोधक म्हणून न पाहता त्याच्याही भावना, भीती, अपेक्षा आणि दुःख आहेत हे स्वीकारतो, तेव्हा हिंसेची मानसिकता कमकुवत होते. अहिंसा माणसाला स्वकेंद्रिततेपासून सहवेदनेकडे घेऊन जाते. म्हणूनच करुणा, सहानुभूती आणि संवेदनशीलता या अहिंसेच्या अंतर्गत शक्ती आहेत.परस्पर सन्मानाशिवाय अहिंसा पूर्ण होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीचे जीवन आणि प्रतिष्ठा मूल्यवान आहे. सामाजिक किंवा आर्थिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय, भाषा, लिंग किंवा इतर कोणताही फरक असला तरी मानवी सन्मान कमी-अधिक होत नाही. दुसऱ्याला तुच्छ लेखणे, त्याचे म्हणणे ऐकून घेण्यास नकार देणे किंवा त्याला अपमानित करणे ही अहिंसक वृत्ती नाही. अहिंसा आपल्याला दुसऱ्याशी सहमत होण्याची सक्ती करत नाही; परंतु असहमत असतानाही त्याला माणूस म्हणून सन्मान देण्याची शिकवण देते. सन्मानातून संवाद निर्माण होतो आणि संवादातून संघर्षाचे हिंसक रूप टाळण्याची शक्यता वाढते.आज अहिंसेचा विचार डिजिटल जगालाही लागू होतो. समाजमाध्यमांवरील प्रतिक्रिया काही क्षणांत मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे अपमानास्पद भाषा, धमक्या, अफवा आणि द्वेषपूर्ण संदेशांचा परिणाम व्यापक होऊ शकतो. प्रत्यक्ष भेटीत आपण वापरणार नाही अशी भाषा पडद्यामागून वापरणेही अहिंसेच्या मूल्यांशी विसंगत आहे. डिजिटल माध्यमांवर प्रश्न विचारणे, टीका करणे किंवा असहमती व्यक्त करणे स्वाभाविक आहे; परंतु व्यक्तीला अपमानित करणे, द्वेष निर्माण करणे किंवा खोटी माहिती पसरविणे हे अहिंसक वर्तन नाही. त्यामुळे आधुनिक काळातील अहिंसा ही डिजिटल जबाबदारीशीही जोडली गेली आहे.अहिंसा ही केवळ मोठ्या संघर्षांच्या वेळी आठवणारी संकल्पना नसून रोजच्या जीवनातील व्यवहारातून व्यक्त होणारे मूल्य आहे. घरातील मतभेद शांतपणे सोडविणे, दुसऱ्याचे म्हणणे पूर्ण ऐकणे, रागाच्या क्षणी थांबून विचार करणे, चूक झाल्यास क्षमा मागणे, दुसऱ्याची चूक झाल्यास सूड न घेणे आणि कोणाच्या अपमानातून आनंद न मानणे या साध्या कृती अहिंसेला व्यवहारात आणतात. अहिंसा मोठ्या घोषणांपेक्षा अशा छोट्या सवयींमध्ये अधिक स्पष्ट दिसते. व्यक्तीच्या वर्तनातील संयम कुटुंबातील संबंधांवर आणि कुटुंबातील वातावरण समाजातील संबंधांवर परिणाम घडवते. त्यामुळे अहिंसा व्यक्तीपासून व्यापक सामाजिक जीवनाकडे विस्तारत जाणारी प्रक्रिया आहे.अहिंसेसाठी आत्मपरीक्षणही आवश्यक आहे. आपण दुसऱ्याच्या हिंसेकडे सहज लक्ष देतो; परंतु आपल्या विचारांत, शब्दांत आणि वर्तनात हिंसेची कोणती रूपे आहेत, याचा विचार कमी करतो. एखाद्याला सतत कमी लेखणे, पूर्वग्रहातून निर्णय घेणे, त्याचे म्हणणे ऐकून न घेणे किंवा स्वतःच्या मतालाच अंतिम सत्य मानणे या वृत्तींचे परीक्षण करणे गरजेचे आहे. अहिंसा म्हणजे सतत दुसऱ्याला बदलण्याचा आग्रह नव्हे; तर स्वतःच्या प्रतिक्रियांची जबाबदारी स्वीकारणे होय. स्वतःच्या रागाची, अहंकाराची आणि पूर्वग्रहांची जाणीव झाली की आत्मसंयम विकसित होतो आणि अहिंसक वर्तन अधिक सहज शक्य होते.अहिंसा आणि शांतता यांचा संबंध जवळचा असला तरी दोन्ही संकल्पना समान नाहीत. संघर्ष बाहेरून थांबला तरी मनात द्वेष आणि वैर कायम असेल तर खरी शांतता निर्माण होत नाही. अहिंसा मनातील वैर कमी करण्याचा आणि संबंधांना सन्मानाची दिशा देण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे शांतता टिकविण्यासाठी केवळ संघर्ष थांबविणे पुरेसे नसून संवाद, परस्पर सन्मान, क्षमा आणि सहअस्तित्वाची भावना विकसित करावी लागते. या अर्थाने अहिंसा ही टिकाऊ शांततेची मानसिक आणि नैतिक पायाभरणी ठरते.आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाचा उद्देश शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून अहिंसेचा संदेश व्यापक समाजापर्यंत पोहोचविणे हा आहे. संयुक्त राष्ट्रांच्या ठरावातून अहिंसेच्या सार्वत्रिक महत्त्वावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे अहिंसा ही कोणत्याही एका समाजापुरती मर्यादित संकल्पना नाही. मानवी प्रतिष्ठेचा आदर, संघर्षाचे शांततामय निराकरण, सहिष्णुता, परस्पर समज आणि दुसऱ्याच्या अधिकारांचा स्वीकार ही तिची सार्वत्रिक मूल्ये आहेत. विविध समाजांमध्ये तिची अभिव्यक्ती वेगवेगळी असली तरी तिच्या केंद्रस्थानी माणूस, त्याची प्रतिष्ठा आणि सन्मानपूर्वक सहअस्तित्व हीच भूमिका आहे.आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनात अहिंसेची गरज अधिक जाणवते. मात्र ती केवळ संघर्षाच्या प्रसंगी आठवणारी संकल्पना न राहता रोजच्या जीवनाचा भाग बनली पाहिजे. रागाच्या क्षणी संयम राखणे, मतभेदाच्या वेळी संवाद साधणे, चूक झाल्यास क्षमा मागणे, दुसऱ्याच्या चुकीला सूडाने उत्तर न देणे आणि समोरच्याच्या मानवी प्रतिष्ठेचा आदर करणे यातून अहिंसा प्रत्यक्ष जगता येते. तिचा मार्ग नेहमी सोपा नसला तरी तो माणसाला स्वतःवर नियंत्रण ठेवण्याची आणि इतरांशी अधिक संवेदनशीलतेने वागण्याची संधी देतो.२ ऑक्टोबरचा आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणूनच केवळ दिनविशेष न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस ठरावा. अहिंसा म्हणजे हिंसक साधनांचा त्याग करण्याइतकीच मनातील द्वेष कमी करण्याची प्रक्रिया आहे. ती विचारांना व्यापकता, वाणीला संयम आणि कृतीला विवेक देते. ती मतभेदांना वैरात बदलू देत नाही आणि संघर्षाला संवादाची दिशा देते. अहिंसा ही भीतीची भाषा नाही; ती आत्मसंयमाची भाषा आहे. ती निष्क्रियतेची खूण नाही; ती सजग मानवी कृतीची दिशा आहे. आणि ती केवळ हिंसेचा अभाव नसून करुणा, संयम, क्षमा, सन्मान आणि सहअस्तित्व यांवर उभे असलेले जीवनमूल्य आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६


# वैरण विकास कार्यक्रम : पशुपालनाला स्थैर्याची नवी दिशा

राज्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी वैरण विकास कार्यक्रम हा केवळ चारा उपलब्धतेचा प्रश्न सोडविणारा उपक्रम न ठरता पशुपालन अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणारे महत्वाचे पाऊल ठरणार आहे. स्थानिक पातळीवर वर्षभर पुरेसा आणि पौष्टिक चारा उपलब्ध करण्यावर भर दिल्यास पशुपालकांचे बाहेरील चाऱ्यावरचे अवलंबित्व कमी होऊ शकते. शासकीय पडीक, गायरान तसेच उपलब्ध जमिनींचा नियोजनबद्ध वापर करून चारा उत्पादन वाढविणे, सुधारित चारा वाणांना प्रोत्साहन देणे आणि वैरणीच्या झाडांची लागवड वाढविणे यामुळे पशुधनासाठी सातत्यपूर्ण खाद्यसुरक्षा निर्माण होण्यास मदत होईल. त्यातून पशुधनाचे आरोग्य व उत्पादकता टिकून राहण्याबरोबरच दुग्ध व्यवसायाचा खर्च नियंत्रित करण्यास हातभार लागू शकतो. विशेषतः दुष्काळ आणि पावसाच्या अनिश्चिततेच्या काळात चारा टंचाईवर तात्पुरती उपाययोजना करण्याऐवजी दीर्घकालीन व्यवस्था उभारणे, हे या कार्यक्रमाचे सर्वाधिक महत्वाचे वैशिष्ट्य ठरते. पशुपालन व्यवसायासाठी चारा ही जीवनरेखा आहे. राज्यातील हिरव्या व सुक्या चाऱ्यातील तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारने प्रथमच 'वैरण विकास धोरण' लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दुष्काळी भागात तातडीने चारा उपलब्ध करून देण्याबरोबरच राज्यासाठी दीर्घकालीन चारा सुरक्षा निर्माण करण्याच्या दुहेरी उद्देशाने हे धोरण जाहीर केले आहे. राज्यातील सुमारे 2 कोटी 78 लाख पशुधनासाठी हिरवा आणि सुका चारा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविणे, उपलब्ध चाऱ्याची गुणवत्ता सुधारणे, त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे आणि पर्यायी चारा संसाधनांना चालना देणे, अशा व्यापक उपाययोजनांचा धोरणात समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी 496 कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीचे नियोजन असून, वार्षिक 12 हजार लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे. 2026 च्या खरीप हंगामात 'ट्रिगर-1' लागू झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांसाठी 25 सप्टेंबर 2026 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनेचाही समावेश आहे.चारा तूट कमी करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना राज्यातील पशुधन संख्या, उपलब्ध चारा आणि चाऱ्याची तूट विचारात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी 20 नोव्हेंबर 2023 च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय कृती दल स्थापन करण्यात आले होते. या कृती दलाने चारा टंचाई दूर करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस केली आहे.

राज्यात सुमारे 2 कोटी 78 लाख पशुधन आहे. या पशुधनासाठी 1 हजार 176.78 लाख मेट्रिक टन हिरव्या चाऱ्याची गरज असताना 907.49 लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. हिरव्या चाऱ्याची तूट 268.37 लाख मेट्रिक टन म्हणजेच 22.79 टक्के आहे. सुक्या चाऱ्याची गरज 377.87 लाख मेट्रिक टन असून, प्रत्यक्ष उपलब्धता 296.62 लाख मेट्रिक टन आहे. त्यामुळे सुक्या चाऱ्याची तूट 81.06 लाख मेट्रिक टन म्हणजे 21.43 टक्के आहे. पशुपालन व्यवसायासाठी चारा हा अत्यावश्यक घटक असल्याने ही तूट भरून काढण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपायांची आवश्यकता आहे. पडीक व गायरान जमिनीवर चारा लागवड

चारा लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी महसूल आणि वन विभागाच्या शासकीय पडीक, गायरान किंवा मुलकी पड जमिनींचा वापर करण्याचा विचार आहे. कुरण आणि गायरान जमिनींमध्ये सुधारित गवत तसेच द्विदल चारा पिकांच्या जातींची लागवड केली जाणार आहे. 'हॉर्टी-पाश्चर' पद्धतीत फळबागांमधील दोन झाडांच्या मोकळ्या जागेत चारा वाणांची लागवड करून दुहेरी उत्पादन घेण्यात येणार आहे. 'सिल्वी-पाश्चर' पद्धतीत पडीक, खडकाळ किंवा डोंगराळ जमिनीवर सुबाभूळ, अंजन आणि शेवगा यांसारख्या चारा देणाऱ्या झाडांसोबत बहुवार्षिक गवताची लागवड केली जाईल. शेतातील बांध, बंधारे, तलावांचे बांध, परसबाग, जलमार्ग तसेच नापीक आणि मशागतीस अयोग्य जमिनींचाही चारा उत्पादनासाठी उपयोग केला जाणार आहे. अशा जागांवर गिनी गवत, सिग्नल गवत आणि स्टायलो गवताची लागवड करण्याचा प्रस्ताव आहे.चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यावर भर उपलब्ध चाऱ्याचे केवळ प्रमाण वाढविण्याबरोबरच त्याची गुणवत्ता आणि पौष्टिक मूल्य सुधारणे हा धोरणाचा महत्वाचा भाग आहे. त्यासाठी मुरघास निर्मिती, चाऱ्यावर युरिया प्रक्रिया, कापूस पिकाच्या टाकाऊ अवशेषांवर ओझोन प्रक्रिया आणि एन्झाइम अर्थात विकर प्रक्रिया अशा तंत्रांचा वापर केला जाणार आहे. कृषी अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांमधील उपपदार्थांचा योग्य वापर करून त्यांचे पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघासामध्ये रूपांतर करण्यात येईल. यामुळे अन्यथा वाया जाणाऱ्या कृषी अवशेषांचा पशुखाद्यासाठी उपयोग होऊन चारा सुरक्षेला बळकटी मिळणार आहे.शास्त्रीय साठवणुकीतून टंचाईग्रस्त भागांना पुरवठा वैरण विकास धोरणानुसार, उपलब्ध चारा अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी शास्त्रीय साठवणुकीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी 'हे बेल्स', 'फीड ब्लॉक', 'लीफ मिल' आणि कडबाकुट्टी या पद्धतींचा अवलंब केला जाईल. चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढल्याने अतिरिक्त उत्पादनाच्या काळात त्याची साठवणूक करून टंचाईच्या काळात गरजू भागांना पुरवठा करणे शक्य होणार आहे.

चारा कापणी, प्रक्रिया, वाहतूक आणि जनावरांना चारा देताना होणारा अपव्यय रोखण्यावरही भर दिला जाणार आहे. योग्य प्रक्रिया व साठवणुकीमुळे उपलब्ध चाऱ्याचा अधिक परिणामकारक वापर करता येणार आहे. पारंपरिक चारा पिकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी चारा संसाधनांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्यामध्ये अझोला उत्पादन, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती आणि काटेविरहित निवडुंगाचा चारा म्हणून वापर यांचा समावेश आहे. कमी जमीन आणि मर्यादित पाण्यामध्ये चारा उपलब्ध करून देण्यासाठी या पर्यायांचा उपयोग होणार आहे. वैरण ग्राहक सेवा केंद्रांची निर्मिती, सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चारा विकास, चारा विकास विस्तार उपक्रम आणि संस्थात्मक बियाणे साखळी उभारणे या पूरक उपाययोजनांचाही धोरणात विचार करण्यात आला आहे. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राच्या सहकार्याने चारा उत्पादन, प्रक्रिया व उपलब्धतेची व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहणार आहे.दुष्काळी भागांसाठी तातडीचा लाभ

सद्यस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कमी पाण्यात चारा उत्पादन घेण्यावर अल्पकालीन भर दिला जाणार आहे. उपलब्ध चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढवून त्याची योग्य साठवणूक केल्यास पुढील काळात टंचाईग्रस्त भागांना पुरवठा करणे सुलभ होईल. दीर्घकालीन उपायांमधून पशुपालनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करणे, पशुजन्य उत्पादनांमध्ये स्वयंपूर्णता साधणे आणि पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे स्वरूप देण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतून सुमारे 25 लाख लाभार्थ्यांना लाभ अपेक्षित असून, त्यापैकी वैरण विकास कार्यक्रमातून वार्षिक 12 हजार रोजगार निर्माण करण्याचे नियोजन आहे. पशुपालकांचे उत्पन्न वाढल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.'विकसित महाराष्ट्र 2047' शी थेट जोड 'विकसित महाराष्ट्र 2047' कार्यक्रमामध्ये पीक अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांतील उपपदार्थांचा वापर पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघास निर्मितीसाठी करून चारा सुरक्षा मजबूत करण्याच्या उपाययोजनेचा समावेश आहे. त्याद्वारे दुग्धव्यवसाय आणि पशुपालन या शेतीपूरक व्यवसायांना उद्योजकतेचे स्वरूप देण्याचा उद्देश निश्चित करण्यात आला आहे. राज्यात पशुपालन व्यवसायामध्ये उद्योजकता निर्माण करण्याच्या व्यापक धोरणातून वार्षिक सुमारे 25 लाख लाभार्थ्यांना लाभ देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी अंदाजे 4 हजार 500 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे. यातील वैरण विकासाशी संबंधित कार्यक्रमासाठी 12 हजार लाभार्थी आणि 496 कोटी रुपयांच्या तरतुदीचे नियोजन करण्यात आले आहे. वैरण विकास धोरणाचा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे चारा टंचाईकडे केवळ आपत्कालीन मदत म्हणून न पाहता चारा उत्पादन, जमीन वापर, गुणवत्तापूर्ण वाण आणि साठवणूक यांचे दीर्घकालीन नियोजन करण्याकडे शासनाचा कल आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यात आले असून या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता अधिक सक्षमपणे उपलब्ध होईल. तसेच पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या शेतीपूरक व्यवसायांना भक्कम बळ मिळणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा मिळेल.

**पंकजा मुंडे,**
**पशुसंवर्धन मंत्री**


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०२ ऑक्टोबर २०२६


## बीड जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' प्रभावीपणे सुरू; विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध लाभांचे व प्रमाणपत्रांचे वाटप !




**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आणि मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा प्रशासनाच्या वतीने बीड जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिरांचे' आयोजन करण्यात आले आहे. या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत शासकीय योजना पोहोचवून त्यांना थेट लाभ देण्याचा सपाटा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित विशेष प्रमाणपत्र व लाभ वाटप कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभांचे व प्रमाणपत्रांचे औपचारिक वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय, बीडच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता यांच्यासह प्रशासकीय यंत्रणेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विविध योजनांच्या लाभांचे व प्रमाणपत्रांचे वितरणशासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी नागरिकांना होणारा त्रास वाचवणे आणि कागदपत्रांची पूर्तता सुलभ करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमादरम्यान विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे विविध महत्त्वाचे लाभ व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली: बिरसा मुंडा सिंचन विहीर योजना: आदिवासी व पात्र शेतकरी बांधवांना समृद्ध करण्यासाठी बिरसा मुंडा विहीर योजनेच्या मंजुरीपत्रांचे वाटप करण्यात आले.नवीन वीज जोडणी: शेती व इतर उपयोगांसाठी आवश्यक असलेल्या नवीन वीज जोडणीच्या मंजुरीचे आदेश लाभार्थ्यांकडे सुपूर्द करण्यात आले.दिव्यांग प्रमाणपत्र: दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध सवलती व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या दिव्यांग प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.नागरिकांशी थेट संवाद आणि सूचनांचे स्वागतया वेळी शासन स्तरावरून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेत असताना, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रमाणपत्र व योजनांचा लाभ मिळवताना नागरिकांना प्रत्यक्ष व्यवहारात येणाऱ्या अडीअडचणींची सविस्तर माहिती घेतली. तसेच, या अडचणी कायमस्वरूपी दूर करण्यासाठी लाभार्थी आणि उपस्थित नागरिकांकडून स्वतः उपाय व सूचना सुचवण्याचे आवाहन त्यांनी केले.नागरिकांनी व लाभार्थ्यांनी या संवादात उत्स्फूर्त सहभाग घेत प्रशासकीय प्रक्रिया अधिक सुटसुटीत करण्यासाठी काही मोक्याच्या व आवश्यक सूचना केल्या. नागरिकांकडून आलेल्या या सूचनांची दखल घेत प्रशासनाने त्यावर गांभीर्याने काम करण्याचे व योग्य ती सुधारणा करण्याचे आश्वासन दिले.तळागाळातील घटकांना थेट दिलासाशासन आणि प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे राबविण्यात येत असलेल्या या लोककल्याणकारी अभियानामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी, मजूर, दिव्यांग आणि गरजू घटकांचे महसुली व शासकीय प्रश्न तातडीने मार्गी लागत आहेत. शासनाचे उपक्रम तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना थेट दिलासा देण्याच्या या संपूर्ण प्रक्रियेचे सर्वसामान्य जनतेतून जोरदार स्वागत होत आहे.

## दुष्काळात चारा-पाण्याला प्रथम प्राधान्य; गावनिहाय सूक्ष्म नियोजनाचे विभागीय आयुक्तांचे निर्देश

**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीत चारा आणि पाणी यांना प्रथम प्राधान्य द्या, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी दुष्काळ, खरीप हंगाम आणि महसूल विभागाच्या उपक्रमांचा आढावा घेतला.बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, परिविक्षाधीन सहायक जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, सर्व विभागप्रमुख, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.*पुढील दहा महिन्यांचे नियोजन*प्रत्येक गाव आणि तांड्याचे सूक्ष्म नियोजन करावे, असे आयुक्तांनी सांगितले. तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांनी प्रत्येक गावाची प्रत्यक्ष पाहणी करावी. पुढील दहा महिन्यांच्या पाणी व चाऱ्याचे नियोजन करावे. टँकरवर अवलंबून न राहता दीर्घकालीन उपाययोजना राबवाव्यात. टँकरच्या खर्चात तात्पुरती पाइपलाइन देऊन पाणी देता येत असेल, तर तो पर्याय तपासावा. आवश्यक ठिकाणी टँकर फिलिंग पॉइंट उभारावेत. पाणीचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. उपलब्ध पाणी केवळ पिण्यासाठी वापरावे, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.दुष्काळात प्रत्येक गावात रोजगार हमी योजनेची कामे सुरू असावीत, प्रत्येक गरजूला काम मिळावे आणि त्याचा मोबदलाही वेळेत मिळावा, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. गरिबीपोटी अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी जिल्ह्यात सामूहिक विवाह मेळावे आयोजित करण्याचे निर्देशही देण्यात आले.*जिल्ह्यातील दुष्काळाची स्थिती*30 सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात सरासरी 566.1 मिमी पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात 356.6 मिमी (सुमारे 63 टक्के) पाऊस झाला. केज तालुक्यात सर्वाधिक 93.4 टक्के, तर गेवराईत सर्वात कमी 42.5 टक्के पाऊस नोंदला गेला.- *भूजल :* निरीक्षण विहिरींतील सरासरी पाणीपातळी 7.36 मीटरवर गेली आहे. ती मागील पाच वर्षांच्या सप्टेंबर सरासरीपेक्षा (2.81 मीटर) 4.55 मीटरने खोल आहे. तपासलेल्या सर्व 126 विहिरींत घट आहे. गेवराईत 6.64 मीटरची सर्वाधिक घट आहे.- *धरणे :* 164 प्रकल्पांमध्ये केवळ 16.38 टक्के उपयुक्त साठा आहे. माजलगाव प्रकल्पात 28.53 टक्के, मध्यम प्रकल्पांत 12.49 टक्के आणि लघु प्रकल्पांत 5.49 टक्के साठा आहे. 32 प्रकल्प कोरडे आहेत.- *टँकर :* 29 सप्टेंबरअखेर 63 गावे आणि 71 वाड्यांतील सुमारे 2.11 लाख लोकसंख्येला 143 टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. 28 गावे व 32 ठिकाणी विहीर/बोअर अधिग्रहण करण्यात आले आहे. ऑक्टोबर 2026 ते जून 2027 साठीचा टंचाई कृती आराखडा तयार केला जात असून तो शासनाला सादर केला जाईल.- *चारा :* उपलब्ध चारा सरासरी सुमारे 37 दिवस पुरेल. पाटोदा (21 दिवस) आणि आष्टी (27 दिवस) येथे परिस्थिती अधिक बिकट आहे. परळीत हा साठा सर्वाधिक, म्हणजे 70 दिवस पुरेल एवढा आहे.*खरीप पेरणी व पीक नुकसान*खरीप हंगामात 8,08,946 हेक्टर अपेक्षित क्षेत्रापैकी 7,87,218 हेक्टरवर (97.31 टक्के) पेरणी झाली. सोयाबीनची पेरणी 137.90 टक्के, तर कापसाची 78.36 टक्के झाली. प्राथमिक पाहणीत जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांत 75 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान आढळले असून, बाधित क्षेत्र सुमारे 5.14 लाख हेक्टर असल्याचा अंदाज आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना 2.0 अंतर्गत (पाणलोट विकास) आष्टी, बीड व गेवराई येथील तीन प्रकल्पांसाठी 2,341.33 लाख रुपये मंजूर आहेत. यातून 10,642 हेक्टर क्षेत्र उपचारित होणार आहे.*कार्यालयीन स्वच्छता व शिस्त*कार्यालयांत स्वच्छता राखणे बंधनकारक असून, दर सोमवारी सकाळी एक तास स्वच्छता करावी लागेल. 9 ऑक्टोबरनंतर कार्यालय किंवा शौचालयांत अस्वच्छता आढळल्यास कार्यालयप्रमुख व संबंधित अधिकाऱ्यांना 1,000 रुपयांपर्यंत दंड होईल. शौचालये अस्वच्छ आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या केबिनमधील शौचालये सील केली जातील. महात्मा गांधी जयंतीनिमित्त 2 ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष स्वच्छता मोहीम घेतली जाणार आहे.*सेवा संकल्प अभियान*17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर या कालावधीत राज्यात ‘सेवा संकल्प अभियान’ राबवले जात आहे. त्यात फेरफार नोंदींचा निपटारा, जिवंत सातबारा, स्वामित्व सनद, शिधापत्रिका, विविध प्रमाणपत्रे अशा 22 सेवा दिल्या जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरे 6 ते 15 ऑक्टोबरदरम्यान सर्व तालुक्यांत होतील. ‘राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता’ अभियानात विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना योजनांचा लाभ व प्रमाणपत्रे दिली जात आहेत. बीड तालुक्यात 1 ऑक्टोबरच्या शिबिरात 68 लाभार्थ्यांना विविध लाभ मिळाले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002